# खंडेलवाल महाविद्यालयात सायबर अटॅकविषयी डेमॉन्स्ट्रेशन

अजिंक्य भारत 28-12-2022

**अकोला, दि. २७ प्रतिनिधी** स्थानिक डापकी रोड स्थित शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात सायबर अटॅक आणि सुरक्षे विषयी लाईव्ह डेमॉन्स्ट्रेशन संपन्न झाले. पदमानंद सभागृहामध्ये झालेल्या या कार्यक्रमात फ्री वायफाय वापरताना हॅकर, राउटर आणि युजर मध्ये येवून डाटा हॅक करू शकतो,कमीत कमी आठ मिक्स कॅरेक्टर असलेला पासवर्ड असावा म्हणजे पासवर्ड हॅक होऊ शकत नाही. इंटरनेट २४ तास ऑन असेल तर मोबाईल कॅमेरा हॅक होऊ शकतो म्हणून आवश्यकता असल्यासच नेट चालू असावे आणि नंतर बंद करावे. डमी वेबसाईट कशा ओळखाव्या, फिशिंग अटॅक, व्हायरस अटॅक, ब्लॅकमेल, स्टॉकिंग कसे होतात आणि यावेळी नेमकी कोणती काळजी घ्यावी. मोबाईलमध्ये टू- स्टेप व्हेरिफिकेशन करावे, अँटीव्हायरस इंस्टॉल करावे, पायरेटेड आणि फ्री सॉफ्टवेअर वापरू नये, या विषयीची सविस्तर माहिती सायबर वॉरिअर आदित्य बोडखे यांनी डेमॉन्स्ट्रेशनद्वारे उपस्थितांना दिली. तुमचे कुरिअर आले आहे, तुम्ही बुकिंग केले नसेल तर कांसलेशन मेसेज येईल, त्यावरील ओटीपी सांगा असे सांगत कुरिअर बॉय सहज फसवणूक करत आहेत, इलेक्ट्रिक बिल न भरल्यामुळे तुमचे मीटर डीसकनेक्ट होईल. तसे होऊ नये म्हणून खालील नंबरवर कॉल करा. असे मेसेज येत आहेत, या नंबरवर कॉल केल्यानंतर माहिती आणि ओटीपी आपणाकडून मिळवून बँक अकाऊंट खाली केले जात आहे. ओटीपी ऐवजी व्हेरिफिकेशन कोड हा शब्दप्रयोग करून फसवणूक करत आहेत. तरुण मुले मुली, फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सप या सोशल मीडियाच्या मध्मातून कसे फसतात हे सर्व दाखविणारे पथनाट्य महाविद्यालयातील सायबर वॉरियर्स यांनी सादर केले. सभागृहामध्ये एका बाजूला सायबर गुन्ह्यांचे प्रकार आणि त्याविषयीची सुरक्षा या विषयी मोठ्ठी रांगोळी काढण्यात आली होती आणि पोस्टर्स लावण्यात आले होते. विवध प्रकारे उपस्थितांमध्ये सायबर गुन्हे आणि सुरक्षा विषयी जागृती करण्यात आली. हा उपक्रम क्किक हिल फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर यांच्या सहयोगाने आणि माहविद्यालयातील भौतिकशास्त्र विभाग आणि आय क्यू ए सी यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर वॉरियर्स यांनी आयोजित केला होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमाचे समन्वयक, डॉ. हरिदास खरात यांनी केले आणि उपक्रमाचा उद्देश आणि महाविद्यालयाची भूमिका स्पष्ट केली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. जगदीश साबू यांनी स्वानुभव सांगताना सायबर सूरक्षे विषयी जागृतेची नितांत गरज असल्याचे सांगितले. आपले महाविद्यालय २०१८-१९ पासूनच सायबर सुरक्षे विषयी जनजागृती करीत असून याही वर्षी अकोला जिल्ह्यातील अनेक शाळेमध्ये जावून १६ सायबर वॉरियर्स यांनी ३१००० विद्यार्थ्यानमध्ये जागृती केली.या सोबतच समाजातील काही घटकांमध्ये जावून देखील समाज प्रबोधनाचे कार्य केल्याचे सांगितले. समाजोपयोगी आणि अभिनव असा हा उपक्रम पुढेही चालू ठेवावा असे आव्हानं करून सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी मोबाईल आणि इंटरनेटचा योग्य पद्धतीने वापर करण्यासाठी सर्वांना शपथ देण्यात आली आणि सायबर सुरक्षा टिप्स असलेले माहितीपत्रक उपस्थितांना वाटप करण्यात आले. यावेळी आय क्यू ए सी समन्वयक प्रा. रोहन शिरसाट, भौतिकशास्त्र विभागप्रमुख, डॉ. संजय देवडे, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी, भिकमचंद खंडेलवाल,मोहरीदेवी खंडेलवालआणि खंडेलवाल इंग्लिश शाळेतील शिक्षक वृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.